पुढारी पान क्र.3

दि. 25/04/2023

# खारघर दुर्घटनाप्रकरणी विधिमंडळाचे दोनदिवसीय विशेष अधिवेशन बोलवा

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांची मागणी

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

खारघर घटनेची सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी यांसाठी विधिमंडळाचे दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवण्यात यावे. तसेच दुर्घटनेची जबाबदारी घेऊन मुंख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा, अश्या मागण्या महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीस शिवानी वड्डेट्टीवार यांनी आज वसईत बोलताना केल्या.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात खारघर येथे बळी ठरलेल्या श्री सदस्यांच्या मृत्यूबद्दल सरकारला जाब विचारण्यासाठी वसई काँग्रेस भवन येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषद मध्ये



महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीस शिवानी वड्डेट्टीवार, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव अंकिता कुलदीप वर्तक, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस तथा पालघर लोकसभा निरीक्षक विजय पाटील, जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा, पालघर जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष प्रफुल. पाटील, वसई ब्लॉक अध्यक्ष बिना मायकल फुटयार्डो, माणिकपूर अध्यक्ष व्हिलफेड झिसुझो, महिला अध्यक्ष प्रविणा चौधरी, वसई विरार युवक काँग्रेस अध्यक्ष निखिलेश उपाध्यय व काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

### राज्य शासनावर जोरदार टीका

यावेळी पत्रकारांशी बोलतांना विजय पाटील व ओनिल अल्मेडा यांनी केंद्र व राज्याशी निगडित अनेक प्रश्न उपस्थित करून शासनावर जोरदार टीका केली. महागाई आणि शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर सरकारला शंभर टक्के अपयश आलं असल्याचं त्यांनी सांगितलं. त्याचबरोबर वसईतील बहुजन विकास आघाडीच्या एककल्ली कारभाराचा समाचारही या दोघा नेत्यांनी यावेळी घेतला.

पुढारी पू.पान क्र.2

# मुंबई-ठाण्याशी वसई-विरारला मेट्रोने जोडणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि सध्या शहराची लोकसंख्या २४ लाखांच्या घरात गेली आहे. वसई विरारमधून लाखो लोक मुंबईला काम - धंद्यानिमित्त जातात - येतात. सध्या येथील नागरिकांना रेल्वे व हायवे असे दोनच पर्याय आहेत. रेल्वे डब्यांमध्ये प्रचंड गर्दी असते आणि हायवेवर वाहतूक कोंडी असते. हायवे मार्ग व लोकलला आता मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे वसई विरारला मुंबई - ठाण्याशी मेट्रोने जोडणे आवश्यक आहे. यासाठी वसई विरारपर्यंत मेट्रो मार्ग मंजूर करण्याबाबत व त्याचा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) पूर्ण करण्याबाबतचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते मयुरेश वाघ यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना दिले. त्यावर नक्कीच यात लक्ष देऊन कार्यवाही केली जाईल. वसई - विरारपर्यंत मेट्रो आणण्याचे सरकारचे नियोजन आहे, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

वसई - विरार मेट्रोची मागणी मार्च २०१८ मध्ये त्यावेळचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विरारचे सामाजिक कार्यकर्ते मयुरेश वाघ यांनी केली होती. त्यावेळी फडणवीस यांनी डीएमआरसी यांना वसई विरार मेट्रो मार्गाचा डीपीआर बनविण्याचे आदेश दिले होते. त्यांनी वसई विरार मेट्रोसाठी कोणता मार्ग योग्य असेल याचा प्राथमिक अभ्यासही सुरु केला.

त्यांनी २ मार्ग सुचवले होते. पण पुढे प्रत्यक्षात या प्रकल्पाचे काम मार्गी लागू शकले नाही. यात आता ४ वर्षे निघून गेली आहेत. वसई विरारकरांसाठी मेट्रोची नितांत गरज आहे. एमएमआरडीएच्या आराखड्यात वसई विरारपर्यंत मेट्रो आणण्याचे नियोजन असले तरी ते मेट्रो काम २०२७ मध्ये सुरु करणार असे सांगितले जाते. बाजूच्या मीरा भाईंदरमध्ये मेट्रोचे काम जोरात सुरु आहे. तीच मेट्रो पुढे वसई विरारपर्यंत आणणे गरजेचे आहे. ठाण्याची मेट्रो काशिमीरा पर्यंत येणार असून ती काशिमीरा छत्रपती शिवाजी महाराज चौक मीरारोड ते पुढे वसई विरार पर्यंत मेट्रो कॉरिडॉर प्रस्तावित आहे.

### मेट्रोसाठी डीएमआरसीने सचवले दोन मार्ग

एमएमआरडीएच्या आराखड्यात मीरारोड ते विरार मेट्रो मार्ग प्रस्तावित आहे. गेल्यावर्षी याबाबत आम्ही केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांचीही खासदार राजेंद्र गावित यांच्यासह दिल्लीत भेट घेतली. वसई विरार मेट्रोसाठी २ मार्ग डीएमआरसीने सुचवले आहेत. राज्य सरकार यातील एक मार्ग निश्चित करून मंजूर करेल व राज्य सरकार केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवेल त्यावेळी या मेट्रो प्रकल्पाला निधी देण्याबाबत केंद्र सरकार निर्णय घेऊ शकते असे या बैठकीत मेट्रोशी संबंधित केंद्राच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले होत. अशी माहिती वाघ यांनी दिली. त्यामुळे वसई विरार मेट्रो मंजूर करायची असेल तर राज्य सरकार डीपीआर पूर्ण करून लगेच निर्णय घेऊ शकते. हायवेवरून वसईच्या हद्दीत मेट्रो येऊ शकते तसेच भाईंदर-नायगाव खाडीवर पूल बनवून त्यामार्गेही मेट्रो वसईत येऊ शकते असे २ मार्ग प्रस्तावित आहेत.

पुढारी पान क्र.5

# भाईंदर येथे जुगार खेळणाऱ्या १२ जणांना अटक

**मिरारोड :** मिरारोड-भाईंदर पश्चिमेच्या जय अंबे नगर झोपडपट्टी नं. १ येथील मिठागराच्या बाजुला तीन पत्त्याचा जुगार खेळत असताना भाईंदर पोलिसांनी धाड टाकून १२ जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून १५ हजार ९३० रुपये जप्त करण्यात आले असून त्यांच्या विरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीरा-भाईंदर शहरात जुगार, ऑनलाईन लॉटरी व गुटखा विक्री जोरात सुरू आहे. या बेकायदा धंद्यांनी डोके वर काढल्याने नागरिकांना मात्र मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या बेकायदेशीर धंद्यांच्या तक्रारी येऊ लागल्यानंतर पोलीसांनीही कारवाई करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे. लॉटरी दुकानावर व जुगार खेळणाऱ्यावर कारवाई केल्याचे दिसत आहे. भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील जय अंबे नगर येथे मिठागराच्या जागेत तीन पत्ती जुगार पैसे लावून खेळला जात होता. यावेळी या ठिकाणी पोलिसांनी धाड टाकून जुगार खेळणाऱ्यांना अटक केली आहे. या जुगाऱ्याकडून १५ हजार ९३० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र.1

दि. 25/04/2023

# नालासोपाऱ्यात पाण्यासाठी महिलांचा मोर्चा

## ७२ तासांची प्रशासनाला मुदत



**नालासोपारा :** वसई-विरार महापालिकेच्या प्रभाग समिती ड च्या शिर्डी नगर, वाघोबा नगर, नागेल तलाव, गाला नगर, डी मार्ट परिसर, विणा सरस्वती., राम रहीम नगर, लक्ष्मण नगर, शंखेश्वर नगर येथे पिण्याच्या पाण्याची समस्या उद्भवते. अनियमित पाणीपुरवठा, पाणी न येणे, नळ जोडण्या न देणे, पाण्याची कोणतीही वेळ नियोजित नसणे, व्हॉलमेनची मुजोरी, या समस्यांमुळे त्रस्त झालेल्या महिलांनी मोर्चा काढला. नागरिकांच्या समस्येकडे पालिका अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी महिलांकडून करण्यात आला. विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी महिलांनी ७२ तासांची मुदत प्रशासनाला दिली आहे.

टँकरचे पैसे भरून नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. पाणीपट्टी, घरपट्टी, पालिकेचे इतर कर भरूनसुद्धा नागरिकांना जीवनावश्यक पाणी मिळत नाही. लोकांना पिण्याचे पाणी नाही आणि आपण मात्र प्रभागात बेकायदा गोष्टींना महत्त्व देत आहात. प्रभागात पाण्याचे योग्य नियोजन व्हावे, पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, ज्यांनी पाण्यासाठी अर्ज केले आहेत, त्यांना तात्काळ पाण्याची जोडणी द्यावी, पाणीचोरी रोखावी, टँकर माफियांवर महापालिकेने निर्बंध लावावेत, बेकायदा वॉटर प्लांटवर कारवाई करावी, अशी मागण्या यावेळी महिलांनी केल्या. येत्या ७२ तासांत मागण्या मान्य न केल्यास पालिका अधिकाऱ्यांना फिरू देणार नाही. हे आंदोलन शांततेत होते, परंतु पुढचे आंदोलन तीव्र असेल, असा इशारा नालासोपारा पूर्व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना उपशहर प्रमुख जयेश कदम यांनी दिला आहे. जिल्हा सचिव अनिल चव्हाण, महिला-जिल्हा संघटक-नम्रता वैती, शाखाप्रमुख कुशल बोस, विभागप्रमुख प्रमोद खान, जितेंद्र हजारे आदी उपस्थित होते.

लोकमत पान क्र. 2

# रेल्वेत नोकरीला लावतो सांगून घेतले १२ लाख

## पाच जणांवर गुन्हा, एकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** रेल्वेत टीसीची नोकरी लावण्याचे प्रलोभन दाखवून तरुणाला १२ लाख ४० हजारांना फसवल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एकास अटक झाली असून, चौघांचा शोध सुरू आहे. आरोपींनी तरुणास टीसीच्या गणवेशापासून बनावट नियुक्तीपत्रसुद्धा दिले होते. विशेष म्हणजे वैद्यकीय तपासणीसाठी रक्ताचे नमुनेही घेतले.

काशिमीराच्या मुन्शी कंपाउंडमध्ये राहणाऱ्या. समीर कादरी याने कांदिवलीच्या पोईसर भागातील भरत नारायण झा (वय २८) याला थेट पद्धतीने रेल्वेत टीसीची नोकरी लावतो, असे २०१८ मध्ये सांगितले होते. त्यावेळी समीरने दीड लाख रुपये टोकन म्हणून घेतले. झा याला लखनौच्या रेल्वे मेडिकल सेंटर येथे बोलावून तेथील खान नावाच्या इसमाने वॉर्ड बॉयमार्फत रक्ताचे नमुने तपासणीसाठी घेतले. मेडिकलमध्ये पास झाल्याने पुढील कार्यवाहीसाठी समीर याने आणखी २ लाख घेतले.

### बनावट नियुक्तीपत्र, गणवेशही दिला

झा याला उत्तर प्रदेश, दिल्ली येथे अनेक खेपा मारायला लावून रेल्वेच्या विविध कार्यालय परिसरात बोलावले. त्याला बनावट नियुक्तीपत्र, ओळखपत्र देण्यापासून टीसीचा गणवेशही दिला. मात्र, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर झा याच्या फिर्यादीवरून काशिमीरा पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक निखिल चव्हाण व पथकाने ठाण्याच्या कासारवडवलीतील असलेल्या समीर कादरी याला अटक केली. तो न्यायालयीन कोठडीत आहे, तर उर्वरित चार आरोपींचा शोध सुरू आहे.

त्यानंतर रेल्वेत नोकरीसाठी विविध कारणांनी वेळोवेळी समीरसह खान, पांडे, सौरभ ऊर्फ मनोज यादव, धीरजकुमार सिंग यांनी एकूण १२ लाख ४० हजार उकळले.

लोकमत पू. पान क्र.1

# ग्राहक सहायता क्रमांक शोधणे महिलेला महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** ऑनलाइन खरेदी केलेले टी-शर्ट न आल्याने कुरियर कंपनीचा क्रमांक गुगलवर सर्च करून त्यावर संपर्क करणाऱ्या महिलेची सायबर लुटारूंनी एक लाख ३३ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.

मीरा रोडच्या शांतीनगर सेक्टर ७ मध्ये राहणाऱ्या स्तुती सुनील जोशी यांनी एका कंपनीचे ऑनलाइन टी-शर्ट खरेदी केले होते, मात्र टी-शर्ट न मिळाल्याने कुरियर कंपनीचा क्रमांक गुगलवर सर्च करून त्यांनी त्यावर संपर्क केला. त्यावरील अमित सिंग नाव सांगणाऱ्या व्यक्तीने जोशी यांना पत्ता पडताळणीसाठी मोबाइलवर लिंक पाठवली. लिंकमधील माहिती भरून पाच रुपये पाठविण्यास सांगितले. जोशी यांनी त्याप्रमाणे केले आणि ५ रुपये ऑनलाइन भरले, मात्र त्याचे ट्रान्झेक्शन अपयशी ठरले. त्यावर अमित याने रोहित नावाच्या डिलिव्हरी बॉयचा क्रमांक दिला. त्याच्याशी जोशी यांनी संपर्क साधला असता एक-दोन दिवसांत कुरियर मिळेल, असे त्याने सांगितले. मात्र तो नंतर जोशीजी यांचा कॉल घेत नव्हता. त्यानंतर जोशी यांना त्यांच्या आणि त्यांच्या आईच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने एक लाख ३३ हजार ५०० रुपये काढले गेल्याचे संदेश आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येतात जोशी यांनी तातडीने पोलिस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी २० एप्रिल रोजी नया नगर पोलिस ठाण्यात अनोळखी सायबर लुटारू अमित सिंग आणि राहुलविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून तपास सुरू आहे.

Scanned with CamScanner

लोकमत पान क्र.2

दि. 25/04/2023

पुढारी पू. पान क्र.4

# हॉटेलला रेटिंग देण्याचे काम सांगून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क



**मीरा रोड :** हॉटेलला रेटिंग देण्याच्या बदल्यात पैसे मिळतील, असे सांगून नंतर दुप्पट पैसे देण्याचे आमिष देऊन मीरा रोडच्या महिलेला सायबर लुटारूंनी आठ लाखांना फसविल्याची घटना घडली.

मीरा रोडच्या शांतीनगर सेक्टर १० मध्ये राहणाऱ्या रिमा झाते ह्या नोकरी करतात. त्यांना अज्ञात व्यक्तीने कॉल करून सांगितले की, 'ते सांगतील त्या हॉटेलना रेटिंग देण्याचे काम घरूनच करायचे आहे व त्यासाठी पैसे मिळतील.' रिमा यांनी काम करण्याची तयारी दर्शविल्यावर त्यांना टेलिग्राम ग्रुपमध्ये ॲड करण्यात आले. एका हॉटेलचे रेटिंग दिले म्हणून १५० रुपये जमा झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर एका टेलिग्राम ग्रुप माध्यमातून त्यांना टास्क देण्यात आला. त्यानंतर २ हजार रुपये भरल्यास दुप्पट मिळतील, असे सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी पैसे भरले. टेलिग्राम आयडीधारकाला ग्रुपमध्ये जॉइन करण्यास सांगितले.

पैशांच्या आमिषाने रिमा यांनी टास्क सांगतील तसे थोडे थोडे करून तब्बल आठ लाख रुपये विविध खात्यांमध्ये भरले. मात्र, दुप्पट पैसे मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तीन अनोळखी व्यक्तींवर नयानगर पोलिस ठाण्यात २० एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला.



## मीरारोडमध्ये भाजपचा महारोजगार मेळावा

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील सुशिक्षित बेरोजगार तरुण व तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, याकरीता सोमवारी मीरारोड येथील सेंट्रल पार्क येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान भाजपकडून महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आ. गिता जैन यांच्या हस्ते करण्यात आले. पंडित दिनदयाळ उपाध्याय नामक या महारोजगार मेळाव्यात ४७ बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार रोजगार प्राप्त झाला. तर सुमारे ४०० हुन अधिक बेरोजगारांना मुलाखतीचे पत्र देण्यात आले. या मेळाव्यात सुमारे ४५ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता तर सुमारे ३ हजार बेरोजगारांची रोजगारासाठी नोंद करण्यात आल्याची माहिती आ. गिता जैन यांनी दिली. मेळाव्याच्या आयोजनासाठी राज्याचे रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सहकार्य केल्याचे त्यांनी सांगितले.

लोकसत्ता पू. पान क्र.3

# शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्याला मनसे कार्यकर्त्यांची मारहाण

### कार्यालयातील साहित्याची नासधूस; १४ जणांविरोधात गुन्हे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**'हल्लेखोरांना अटक करा'**

हल्ल्याच्या वेळी शिवसेना (ठाकरे गट) पालघर जिल्हा महिला संघटक नम्रता वैती-ठाकूर यांना अश्लील शिवीगाळ करण्यात आली. मात्र, विनयभंगाचा गुन्हा दाखल केलेला नाही. हल्लेखोरांना अटक करावी आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना ठाकरे गटाने दिला आहे.

**वसई :** शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते ॲड. अनिल चव्हाण यांच्या कार्यालयावर मनसे कार्यकर्त्यांनी रविवारी सायंकाळी हल्ला करून त्यांना मारहाण केली. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात १४ मनसे कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्याविरोधात आक्षेपार्ह विधान केल्यामुळे हा हल्ला केल्याचे मनसैनिकांनी सांगितले.

शिवसेना ठाकरे गटातर्फे शुक्रवारी वालीवच्या प्रभाग समिती 'जी' च्या कार्यालयावर पाणीटंचाईविरोधात मोर्चा काढण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांनी मोर्चाच्या शिष्टमंडळाला वेळ दिला नाही. त्यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते ॲड. चव्हाण यांनी मनसे जिल्हाप्रमुख जाधव यांना भेटायला वेळ असतो, असे सांगून अपशब्द काढले. त्याचा राग मनात धरून मनसेचे स्थानिक पदाधिकारी प्रवीण भोईर, पंकज सावंत आदींसह १४ जणांनी रविवारी सायंकाळी चव्हाण यांच्या कार्यालयात घुसून त्यांना मारहाण केली. यावेळी चव्हाण यांच्या कार्यालयातील साहित्याची नासधूस करण्यात आली.

याप्रकरणी ॲड. चव्हाण यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर मनसेचे प्रवीण भोईर, पंकज सावंत, अमित पाटील, रवी पाटेकर यांच्यासह १० अनोळखी जणांविरोधात मारहाण केल्याप्रकरणी विविध कलमांअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या हल्ल्याप्रकरणी सोमवार सायंकाळपर्यंत कुणाला अटक करण्यात आलेली नव्हती.

माझे विधान आक्षेपार्ह असेल, तर कायदेशीर कारवाई करावी, परंतु ही मनसे कार्यकर्त्यांनी झुंडशाही असल्याचा आरोप तक्रारदार ॲड. चव्हाण यांनी केला. तर, मारहाण झाली नसून आमच्या नेत्याविरोधात अपशब्द खपवून घेणार नाही, असे मनसे नेते प्रवीण भोईर यांनी सांगितले.



## वसईत वाहनचालकांवर बडगा

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** बेशिस्त रिक्षाचालक, हेल्मेट सक्ती, अशा कारवायांनंतर आता वसईच्या वाहतूक विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चारचाकी वाहनचालकांविरोधात कारवाई सुरू केली आहे. विशेषतः मोटारीत विना आसनपट्टा (सीटबेल्ट), कागदपत्रांविना प्रवास केल्याप्रकरणी आतापर्यंत ९०० वाहनचालकांवर कारवाई केली आहे.

प्रवासादरम्यान वाहनचालक व सहप्रवासी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आसन पट्टा महत्त्वाचा आहे. मात्र, काही वाहनचालक आसनपट्टा लावण्याकडे दुर्लक्ष करतात. वसई-विरारमध्येही अनेक वाहनचालक विना आसनपट्टा प्रवास करत आहेत. तर, काही वाहनचालक नियमांचे उल्लंघन करून वाहने चालवित असल्याचे निदर्शनास येत होते.

याआधी दुचाकी व रिक्षा, टेम्पो यांच्यावर कारवाई होत होती. मात्र, यातून चारचाकीचालक मोकाट सुटत होते. याबाबत नागरिकही तक्रारी करत होते. अखेर वसईच्या वाहतूक विभागाने चारचाकी वाहनांच्या विशेष तपासणीला सुरुवात केली आहे.

विशेषतः आसनपट्टा न लावताच प्रवास करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करून कारवाई सुरू केली असल्याचे वाहतूक विभागाने सांगितले आहे. मागील तीन महिन्यात ८३६ विना आसनपट्टा कारवाया केल्या आहेत. तर, एप्रिल महिन्यात ६५ जणांवर कारवाई झाली असल्याची माहिती वसई वाहतूक विभागाने दिली आहे.

Scanned with CamScanner

दि. 25/04/2023

लोकसत्ता पू. पान क्र.३

लोकमत पान क्र.२

# नागरिकांना २५ लाखांचे मोबाइल परत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : चोरलेले शंभरहून अधिक मोबाइल मध्यवर्ती गुन्हे शाखेने हस्तगत केले असून, ते नागरिकांना परत केले आहेत. या मोबाइलची एकूण किंमत २५ लाख रुपये आहे. विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हे मोबाइल चोरण्यात आले होते.

शहरात मोबाइल चोरण्याच्या घटना वाढल्या होत्या. गर्दीचा फायदा घेऊन, रस्त्याने मोबाइलवर बोलत जाणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाइल खेचून नेले होते. याबाबत नागरिकांनी पोलीस ठाण्यांत तक्रारी केल्या होत्या. याप्रकरणी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख आणि त्यांच्या पथकाने विशेष मोहीम हाती घेतली. तांत्रिक विश्लेषण करून विविध हे मोबाइल हस्तगत करण्यात आले आले. हे सर्व मोबाइल वेगवेगळ्या गुन्ह्यांतील होते. हस्तगत करण्यात आलेले मोबाइल तक्रारदार नागरिकांची ओळख पटवून पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या हस्ते देण्यात आले. पोलीस आयुक्तालयात नुकताच हा कार्यक्रम पार पडला. चोरीला गेलेले मोबाइल परत मिळाल्याने नागरिकांना पोलिसांचे आभार मानले.

# अल्पवयीन मुलीची आत्महत्या

वसई : आई रागावल्याने एका १३ वर्षीय मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. वसई पश्चिमेत शुक्रवारी सकाळी ही घटना घडली आहे.

क्षुल्लक कारणावरून आई रागावल्याने मुलीने घरातील शयन कक्षातील लोखंडी अँगलला लुंगीने गळफास घेतला. तिला उपचारासाठी अंबाडी रोड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.




# 'इन्स्टाग्राम'वरून सायबर भामट्याचा तरुणाला गंडा

वसई : 'इन्स्टाग्राम'वर लक्ष्य पूर्ण करण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी विरारमधील तरुणाला सव्वालाख रुपयांचा गंडा घातला आहे.

'इन्स्टाग्राम'वर अनोळखी व्यक्तीने बनावट प्रोफाइल तयार करून ३० वर्षांच्या फिर्यादी तरुणाशी संपर्क साधला. त्याला एक लक्ष्य पूर्ण केल्यास दुप्पट पैसे मिळतील, अशा भूलथापा दिल्या. त्याला बळी पडलेल्या फिर्यादी तरुणास सायबर भामट्याने एक लाख २८ हजार रुपयांचा गंडा घातला. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नोकरीच्या आमिषाने एक लाखाची फसवणूक

वसई : अंधेरी विमानतळावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणाला एक लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी दोन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

नालासोपारा येथील श्रीप्रस्थ परिसरात 'फ्लाइंग जेट स्ट्रीम एव्हीएशन प्रायव्हेट लिमिटेड' नावाचे कार्यालय उघडले होते. मुंबईतील धारावी येथील जनार्दन जैस्वार यांच्या मुलाला नोकरी लावण्यासाठी आरोपींनी दोन लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार एक लाख रुपये फिर्यादीने घेतले होते. मात्र, तरी नोकरी न लावता फसवणूक केली होती. त्यामुळे फिर्यादी जैस्वार यांनी दिलेल्या तक्रारीवरून या कंपनीच्या दोघा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नारळाच्या झाडावरून पडून मजुराचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नारळ काढण्यासाठी झाडावर चढलेल्या मजुराचा खाली पडल्याने मृत्यू झाल्याची घटना वसईत घडली आहे. नवजीवन सोसायटी येथे राहणारा बाबू अमीर शेख (वय ४५) हा मजूर रविवारी दुपारी साडेचारच्या सुमारास वालीव विठ्ठल मंदिराच्या बाजूला असलेल्या नारळाच्या झाडावर चढून नारळ पाडत असताना पाय घसरून खाली पडला होता.

त्याला उपचारासाठी तुळींज, विजयनगर येथील पालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# नवरा बायको लिफ्टमध्ये अडकले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पाटणकरच्या इंपेरियल टॉवरमध्ये राहणारे निखिल कांबळे (वय ३४) व त्यांची पत्नी सोनाली कांबळे हे दोघेही शनिवारी रात्री तानिया हॅरीझॉन मॉलमध्ये शॉपिंगसाठी गेले होते. त्यावेळी इमारतीची नादुरुस्त अवस्थेत असलेली लिफ्ट चालू ठेवल्यामुळे दोघेही अडकून पडल्याने दोघेही प्रचंड घाबरले. लिफ्ट नादुरुस्त अवस्थेत असल्याने संबंधित दाम्पत्याने प्रचंड संताप व्यक्त केला. तसेच सुरक्षेबाबत विचारणा केली.

याबाबत पती, पत्नीने मॉलचे मालक फ्रान्सिस डाबरे आणि पीटर यांना जाब विचारल्यावर शिवीगाळ व दमदाटी केली तसेच तेथून पळ काढला. दरम्यान, याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

दि. 25/04/2023

म.टा.पू. पान क्र.1

# दहिसर टोलनाक्याचे स्थलांतर अधांतरीच



## उपमुख्यमंत्र्यांकडून ठोस आश्वासन नाहीच

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

दहिसर टोलनाका येथे दररोज होणाऱ्या वाहतूककोंडीचा त्रास मिरा-भाईंदरकरांना सहन करावा लागतो. यातून नागरिकांची सुटका करण्याच्या दृष्टीने दहिसर टोलमुक्तीची मागणी आमदार गीता जैन यांनी नुकतीच एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडली होती. मात्र, याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ठोस आश्वासन दिलेले नाही. त्यामुळे दहिसर टोलनाक्याचा मुद्दा पुन्हा अधांतरी राहिल्याची चर्चा रंगली आहे. यापूर्वीदेखील अनेक नेत्यांनी टोलनाका स्थलांतरित करण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

मिरा-भाईंदरकरांना मुंबईला जाण्यासाठी रेल्वे वगळता दहिसर चेकनाक्यामार्गे रस्त्याने जाणे हाच एकमात्र पार्याय आहे. या मार्गावर टोलनाका असल्यामुळे मुंबईत येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची नेहमीच मोठ्या प्रमाणावर वाहतूककोंडी होते. यात वाहनचालकांना अनेकदा सुमारे अर्धा ते एक तास अडकून पडावे लागते. यात इंधनाचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, प्रवास खर्चात वाढ होते. तसेच प्रदूषणातही भर पडते. याचा सर्वाधिक त्रास मिरा-भाईंदरकरांना मुंबईच्या दिशेने जाताना सहन करावा लागतो.

या समस्येमुळे मागील अनेक वर्षांपासून शाळकरी मुलांपासून, नोकरदार, वयोवृद्ध नागरिक असे सर्वच त्रस्त आहेत. हा मुद्दा आमदार गीता जैन यांनी शनिवारी एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर उपस्थित केला होता. नागरिकांना टोलमुक्ती देत, त्यांची कोंडीतून सुटका करण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी, इतर मुद्द्यांवर कार्यवाहीचे ठोस आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. परंतु शहरवासीयांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या टोलनाक्याच्या मुद्द्यावर कोणतेही ठोस आश्वासन त्यांनी दिले नाही. त्यामुळे हा प्रश्न आता पूर्वीप्रमाणेच 'जैसे थे'च राहणार असल्याचे बोलले जाते.

### केवळ बोळवण

२०१९च्या विधानसभा निवडणुकीवेळी बहुतांश उमेदवारांनी दहिसर टोलनाक्याजवळील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. तत्पूर्वीही टोलनाका स्थलांतरित करण्याचा मुद्दा अनेक राजकीय नेत्यांनी उपस्थित केला होता. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, टोलनाका स्थलांतरित होईपर्यंत आपण या संदर्भात राज्य सरकारसह केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे जैन यांनी सांगितले.

म.टा. पान क्र.4

# 'औरंगाबाद जिल्ह्यात तूर्त नामांतर नाही'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

## प्रशासनांना सूचना देण्याची सरकारची न्यायालयात ग्वाही



औरंगाबाद जिल्ह्यातील महसूल विभागांबाबतही नामांतराची अंतिम अधिसूचना जारी होणे बाकी असल्याने 'छत्रपती संभाजीनगर', असे नाव तूर्त लावले जाऊ नये, अशा सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्याची ग्वाही राज्य सरकारने सोमवारी उच्च न्यायालयात दिली.

उस्मानाबाद जिल्ह्याच्या बाबतीतही मागील आठवड्यात राज्य सरकारला अशीच ग्वाही द्यावी लागली होती. कारण उस्मानाबाद शहराचे नामांतर 'धाराशिव' करण्याची अंतिम अधिसूचना जारी झाली असली तरी उस्मानाबाद जिल्हा व महसूल विभागाबाबत तशा नामांतराची अंतिम अधिसूचना अद्याप जारी झालेली नाही. कारण त्याबाबतच्या सूचना-हरकतींची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. औरंगाबादचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला स्थानिक रहिवासी मोहम्मद मुश्ताक अहमद व अन्य काहींनी जनहित याचिकेच्या माध्यमातून आव्हान दिले आहे.

'आम्ही गेल्या वर्षी जुलैमध्ये याचिका केल्यानंतर तातडीच्या सुनावणीसाठी न्यायालयाला विनंती केली होती. मात्र, वेळेअभावी सुनावणी होऊ शकली नाही आणि राज्य सरकारने न्यायालयाकडून मुदतही मागून घेतली होती. दरम्यानच्या काळात याचा गैरफायदा घेत राज्य सरकारने नियम व कायदेशीर प्रक्रिया धाब्यावर बसवून शहराचे नामांतर केले. आता सगळीकडेच नामबदल करण्याचा धडाका लावला आहे', असे म्हणणे याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील युसुफ मुछाला यांनी मांडले. तेव्हा, खंडपीठाने उस्मानाबादबाबतच्या याचिकेतील सरकारच्या भूमिकेकडे लक्ष वेधले. 'उस्मानाबाद जिल्हा व महसूल विभागात अंतिम अधिसूचना जारी होईपर्यंत नामबदल करू नये, अशा सूचना सर्व प्रशासनांना देणार असल्याची ग्वाही राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी दिली होती. तशीच ग्वाही औरंगाबादविषयी दिली तर हा विषय जूनमध्ये अंतिम सुनावणीसाठी ठेवता येईल', असे मत प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापुरवाला व न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने व्यक्त केले. त्याप्रमाणे महाधिवक्ता सराफ यांनी तशी ग्वाही दिल्यानंतर खंडपीठाने ७ जून रोजी अंतिम सुनावणी ठेवली.

Scanned with CamScanner

दि. 25/04/2023

सकाळ पु. पान क्र.1

# मालमत्ता करवाढीविरोधात भाजपचा आक्रमक पवित्रा

## मिरा-भाईंदरमधील नागरिकांना कर न भरण्याचे करणार आवाहन

भाईंदर, ता. २४ (बातमीदार): मिरा-भाईंदर महापालिकेकडून मालमत्ता करात नुकत्याच केलेल्या वाढीविरोधात भारतीय जनता पक्षाकडून आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. ही करवाढ बेकायदा असून ती मागे घेण्यात आली नाही, तर नागरिकांना कर भरू नये, असे आवाहन करण्यात येणार असल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी दिली.

मिरा-भाईंदर- महापालिकेने २८ मार्चला प्रशासकीय ठराव करून नव्याने दहा टक्के पाणीपुरवठा लाभ कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर अग्निशमन सेवा करातही अर्धा टक्क्यांनी वाढ करण्यात येणार आहे. हे दोन्ही कर मालमत्ता कराच्या देयकात समाविष्ट असल्यामुळे नागरिकांच्या मालमत्ता करात वाढ होणार आहे. मात्र ही करवाढ २० फेब्रुवारी आधी न करता २८ मार्चला करण्यात आली असल्यामुळे करवाढ बेकायदेशीर असल्याचा जोरदार आक्षेप भाजपने घेतला आहे. कोणताही नवा कर लागू करायचा असेल तर त्याला २० फेब्रुवारी पूर्वी मान्यता घ्यावी लागते अन्यथा करवाढ बेकायदेशीर ठरते.

### करवाढीची गरजच काय?

मुळात यावर्षी महापालिकेने उत्पन्नात चांगल्या प्रकारे वाढ केली आहे. याबद्दल राज्य सरकारकडून नुकताच महापालिकेला पुरस्कारही मिळाला आहे. शिवाय विविध योजनांसाठी महापालिकेला राज्य सरकारकडून निधी देखील मिळाला आहे असे असताना करवाढ करण्याची आवश्यकताच काय होती असा सवाल नरेंद्र मेहता यांनी उपस्थित केला आहे.

### गीता जैन यांचाही करवाढीला विरोध

करवाढ करण्याचा झालेला प्रशासकीय ठराव पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे या करवाढीला ठाम विरोध आहे. यासंदर्भात आयुक्तांकडे करवाढ रद्द करण्याची लेखी मागणी करण्यात येणार असल्याचे आमदार गीता जैन यांनी सांगितले.


त्यामुळे नवा पाणी पुरवठा लाभ कर अडचणीत आला आहे, अशा आशयाचे वृत्त याआधी सकाळ ने प्रसिद्ध केले होते. आता भाजपनेही हाच मुद्दा उचलून धरला आहे.

महापालिकेने केलेली ही करवाढ २८ मार्चला झाली असल्यामुळे ती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. यापूर्वी देखील अशाच पद्धतीने २० फेब्रुवारी नंतर करवाढ करण्यात आली होती. त्यावेळी उच्च न्यायालयात धाव घेऊन करवाढ रद्द करवून घेतली होती. मात्र करवाढ रद्द होण्याआधी ज्या लोकांनी कराचा भरणा केला त्यांचे पैसे आजपर्यंत परत मिळाले नाही. त्यामुळे ही बेकायदेशीर करवाढ करु नये अशी मागणी आयुक्तांकडे केली आहे. त्यानंतरही त्याची अंमलबजावणी झाली तर कर भरु नका असे नागरिकांना आवाहन करण्यात येईल तसेच बेकायदा करवाढी विरोधात सरकारकडे दाद मागण्यात येईल व वेळ आली तर रस्त्यावर उतरून आंदोलनही केले जाईल असा इशारा नरेंद्र मेहता यांनी दिला. यासंदर्भात भाजपच्या शिष्टमंडळाने आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेतली असता आयुक्तांनी विचार करण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागून घेतली आहे, असे मेहता यांनी सांगितले.

लोकसत्ता पु. पान क्र. 1

# भाईंदर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा मार्ग मोकळा

## १७४ कोटींचा निधी शासनातर्फे उपलब्ध होणार



लोकसत्ता वार्ताहर

भाईंदर : मीरा भाईंदर शहर पूर्णतः सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी महापालिकेने १७४ कोटी रुपयांचा खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे; परंतु गेल्या चार वर्षांपासून मंजुरी आणि निधी उपलब्ध नसल्यामुळे हे रखडले होते. अखेर शनिवारी गृहमंत्र्यांनीच हे काम मार्गी लावणार असल्याची घोषणा केल्याने कॅमेरे लावण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे स्पष्ट झाले.

> सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे चोरीच्या प्रकरणावर आळा घालता येतो. शिवाय या कॅमेऱ्याच्या मदतीने शंभर टक्के गुन्हेगारांना पकडण्यास मदत होते. त्यामुळे या शहरावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजुरी देण्यासह निधी उपलब्ध करण्याचे काम शासनामार्फत केले जाईल.
>
> - देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

रस्त्यावरील वाढत्या दुर्घटना आणि चोरीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी मीरा भाईंदर शहर हे पूर्णतः सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या सूचना गृहविभागाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे एका सल्लागाराची नेमणूक करून गृहविभाग, पालिका आणि पोलीस अशा तिन्ही यंत्रणेने एकत्र येऊन शहराचे सर्वेक्षण केले आहे.

त्यानुसार शहरात सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यासाठी एकूण १७४ कोटी रुपयांचा 'सविस्तर प्रकल्प अहवाल' तयार करण्यात आला आहे. या अहवालास शासनाने मंजुरी दिली आहे; परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे हे काम गृह विभागाकडे रखडले आहे.

परिणामी या कामास विलंब होत असून पालिका प्रशासन जमेल तितके कॅमेरे बसवण्याचे काम करत आहे. तसेच ४ कोटी रुपये खर्च करून पालिकेने नुकतीच गोल्डन नेस्ट उडान पुलाखाली सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रण कक्षाची निर्मिती केली आहे. या नियंत्रण कक्षाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. या वेळी महापालिकेची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याबाबतच्या 'सविस्तर प्रकल्प अहवाला'स मंजुरी देण्यासह मदत करण्याची मागणी आमदार गीता जैन यांनी केली. यावर 'सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उभारणी करणे हे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे या कामास लवकरच मंजुरी देण्यासाठी बैठक आयोजित केली जाईल' अशी घोषणा फडणवीस यांनी आपल्या भाषणात केल्याने कॅमेरे बसवण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला असल्याचे म्हटले जात आहे.

Scanned with CamScanner

दि. 25/04/2023


लोकसत्ता पान क्र.4

# पोलीस दलात मोठे फेरबदल

## सदानंद दाते यांच्यासह तिघे महासंचालकपदी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख सदानंद दाते, ठाण्याचे पोलीस आयुक्त जयजीतसिंग यांच्यासह तीन अधिकाऱ्यांना महासंचालकपदी, १४ अधिकाऱ्यांना विशेष महानिरीक्षक, तर १२ अधिकाऱ्यांना उपमहानिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. अधिकाऱ्यांना पदोन्नती देतानाच पोलीस दलात मोठे फेरबदलही करण्यात आले आहेत. दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख सदानंद दाते, ठाण्याचे पोलीस आयुक्त जयजीत सिंह, आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख बिपिन कुमार सिंह या तिघांना महासंचालक श्रेणीत पदोन्नती देण्यात आली असून सिंह आणि दाते यांना सध्याच्या पदावरच ते पद उन्नत करून कायम ठेवण्यात आले आहे, तर सिंह यांची राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकपदी बदली करण्यात आली आहे. मनोज लोहिया यांची छत्रपती संभाजीनगरचे पोलीस



आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षपदी संजय दराडे, ए.डी. कुंभारे, एम.आर. घुर्ये, संजय शिंदे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, डी.आर. सावंत, आर.बी. डहाळे, अशोक मोराळे, एस.एच. महावरकर, निसार तांबोळी. एस. डी. येनपुरे, जे.डी. सुपेकर यांना पदोन्नती देण्यात आली आहे. दराडे यांची मुंबईबाहेर पुणे येथे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे विशेष महानिरीक्षक म्हणून बदली करण्यात आली असून कुंभारे यांची दहशतवादविरोधी पथकात, घुर्ये यांची नवी मुंबईतून राज्य राखीव बल (पुणे), संजय शिंदे यांची पिंपरी-चिंचवड येथे सहआयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. मुंबई गुन्हे शाखेचे अप्पर आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांची छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष महानिरीक्षक म्हणून डी. आर. सावंत यांची सागरी सुरक्षा विभागाचे विशेष महानिरीक्षक म्हणून, आर.बी. डहाळे यांची राज्य गुप्तवार्ता अकादमीच्या संचालकपदी, तर ठाण्याचे अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांची नागपूरला राज्य राखीव पोलीस बलाचे विशेष महानिरीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे.

अभिनव देशमुख, अनिल पारसकर, एम. राजकुमार, संजय पाटील या मुंबईतील पोलीस उपायुक्तांना पोलीस उपमहानिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. देशमुख यांची दक्षिण प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्तपदी, पारसकर यांची मध्य प्रादेशिक विभागाचे अप्पर आयुक्तपदी, रामकुमार यांची वाहतूक शाखेचे अप्पर आयुक्तपदी, तर संजय पाटील यांची नागपूरला गुन्हे शाखेचे अप्पर आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शशिकुमार मीना, प्रवीण पाटील, वसंत परदेशी, एस.डी. आव्हाड, पी.पी. शेवाळे, ए.एच. चावरिया यांनाही विशेष महानिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. मीना यांना मुंबईत गुन्हे शाखेच्या अप्पर आयुक्तपदी, प्रवीण पाटील यांना पुणे येथे पश्चिम प्रादेशिक विभागाचे अप्पर आयुक्त, परदेशी यांना पिंपरी-चिंचवडमध्ये अप्पर आयुक्त, आव्हाड यांची पुणे गुन्हे अन्वेषण विभागाचे महानिरीक्षक, चावरिया यांची पुण्यात अप्पर आयुक्त (प्रशासन) पदी पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. विरेंद्र मिश्रा यांची विशेष शाखेचे अप्पर आयुक्त, तर दीपक साकोरे यांची नवी मुंबईत गुन्हे शाखेचे अप्पर आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.

पंजाबराव उगले यांची ठाण्यात गुन्हे शाखेचे अप्पर आयुक्तपदी बदली करण्यात आली असून राज्य पोलीस सेवेतील मिलिंद मोहिते यांची पुणे येथे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधीक्षकपदी तर राजलक्ष्मी शिवणकर यांची राज्य राखीव पोलीस बलाचे समादेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner